# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०७.१०.२०२४ (सोमवार**

**पोलीस ठाणे खापा**

**अवैधरित्या वाळु वाहतुक करणाऱ्यांविरूध्द पोलीसांची धडक कार्यवाही ०७ आरोपी गजाआड**

दि. ०६/१०/२०२४ रोजी पोलीस ठाणे खापा हद्दीत पेट्रोलींग दरम्यान ट्रक्टर क्र. एम एच ४० एल ९९१० व विना नंबरचे ट्रालीत विटाचे आत अवैध वाळु लपुन चोरीने भरून वाहतूक करतांनी संशयीतरित्या मिळुन आल्याने ट्रॅक्टर थांबवुन चालक ईश्वर सेवकराम धुर्वे, रा. खापा यांना विचारणा केली असता ट्रालीमध्ये विटा भरलेल्या असल्याचे सांगितले परंतु त्याचे बोलण्या व वागण्यावरून वरून संशय आल्याने ट्रालीमधील दिसत असलेल्या विटाचे थरावर बसलेले मजुर १) गौरीशंकर रामदास भलावी,२) योगेश आजोराम भलावी, ३) राजेश जनकराम धुर्वे, ४) गुडडु धुडुजी नागनवरे, ५) संदिप मधुकर डुईजोड, ६) शुभम विठोबाजी गाडीगोणे यांना खाली उतरवुन विटा बाजुला हटवुन ट्रालीची पाहनी केली असता विटाचे आत पुर्ण ट्राली ही वाळुने भरलेली मिळुन आली तेंव्हा चालकास वाळु वाहतुक करण्याचा परवाना व वाळु कोठुन आनली याबाबत विचारणा करता त्यांने सांगितले की, वाळु ही करजघाट खापा येथुन चोरीने भरून आणलेली असल्याचे सांगितले. वरून खालीलप्रमाणे ०७ आरोपीचे ताब्यातुन मुद्देमाल जप्त केला.

१) ट्रॅक्टर क्र. एम एच ४० एल ९९१० व विना नंबरची ट्राली अंदाजे किमंत ६,००,०००/ व १ ब्रास रेती कि.३०००/— व ३५० विटा किंमत ३५०० असा एकुन ०६,०६,५००/— रूपयाचा मुद्देमाल ०७ आरोपींचे ताब्यातुन पंचासमक्ष ताब्यात घेवून जप्त करण्यात आला व पोलीस स्टेशन खापा येथे वरिल ट्रक्टर चालक ईश्वर सेवकराम धुर्वे, रा. खापा व सहकारी १) गौरीशंकर रामदास भलावी, २) योगेश आजोराम भलावी, ३) राजेश जनकराम धुर्वे, ४) गुडडु धुडुजी नागनवरे, ५) संदिप मधुकर डुईजोड, ६) शुभम विठोबाजी गाडीगोणे यांच्या विरूध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मा. श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मा. श्री अनिल म्हस्के, उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली पो. नि. श्री विशाल गिरी ठाणेदार, पोलीस स्टेशन खापा, पोउपनि सचिन जंगम, पोअं/पन्नालाल बटाऊवाले यांनी केली.

# रामटेक पोलीसांनी अवैध्य जनावर वाहतुक करणाऱ्या टोळीला गजाआड करून ४० जनावरांना दिले अभयदान

दिनांक ०५/१०/२०२४ रोजी पोलीस ठाणे रामटेक येथील पोहवा/२९६ श्याम रामटेके,पोअं/२१५ रामप्रसाद भलावी हे पोलीस स्टेशन हददीत वाहनाने पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, जबलपुर नागपुर महामार्गावरून देवलापार कडुन एक ट्रक क्रमांक MP-51 HA 8786 हा जनावर भरून येत आहे अशा माहिती वरून मनसर फाटा वर नाकाबंदी करून सदर ट्रकला थांबवुन पंचासमक्ष तपासणी केली असता ट्रक मध्ये अत्यंत क्रृरतेनें व निर्दयतेने बांधलेले एकुन ४० जनावरे किंमत १४,६०,०००/—रू/ व ट्रक क्र. MP-51 HA 8786 किंमत १५,००,०००/रू असा एकुन २९,६०,०००/रू चा मुददेमाल पंचासमक्ष जप्त करून जनावरांची योग्यरित्या चारापानी व देखभाल होणे करीता सदरची जनावरे सकृत गोशाळा कल्यानकारी संस्था खैरी लाखनी येथे दाखल करण्यात आले. ट्रक क्र. MP-51 HA 8786 चालक १. हिमायत ईनायत खान, सहकारी २. शाहीन मकबुल कुरेशी, ३. फैजान इस्लाम कुरेशी, सर्व रा. नैनपुर मंडला म.प्र. विरूदध अवैध्यरित्या जनावरांची वाहतुक केल्याने नमुद कलम ११(१)(ड) प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम सहकलम ५(अ),१,बी महा,प्राणी सरक्षण अधिनियम सहकलम ११९ मपोका अन्वये गुन्हा नोंद करून तपासावर आहे,

सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मा.श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा(ग्रामीण), मा. श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली पोनी श्री आसाराम शेटे, पोहवा/२९६ श्याम रामटेके,पोअं/२१५ रामप्रसाद भलावी पार पाडली.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपुर ग्रामीण जिल्हा नागपुर**